**निमित्ताने**



# घुमानचे तीर्थाटन

**कलिम अजीम**

साहित्य संमेलनाचा बिग इव्हेंट पंजाब सरकारच्या मदतीने यशस्वीरीत्या पार पडला असे जरी म्हंटले जात असले, तरी प्रसार माध्यमांत होत असलेलया टीकेकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. नियोजनापासून ते आयोजनापर्यंतच्या अनेक तक्रारी आता हळूहळू पुढे येत आहेत. एव्हाना पंजाबवारी करुन साहित्ययात्री परतले असले, तरी साठ तास प्रवासाचा शीण अजून संपला नाही. असे असले, तरी नामदेव भक्त घुमानवारी करून बरंच काही कमावलं असल्याचा आव आणत जालियनवाला आणि अटारीचे किस्से सांगत सुटले आहेत

दर वर्षी अखिल भारतीय साहित्य संमेलन वादाशिवाय पूर्ण होतच नाही, हे ठरलेलं. राज्यातील साहित्यप्रेमी आणि रसिकांना आता साहित्य महामंडळाचा नियमित होणारा वाद अंगवळणी पडला आहे. पंजाबच्या घुमानला झालेलं हे संमेलन खरोखरच वेगवेगळ्या कारणांनी ऐतिहासिक ठरलं आहे. मग तो रेल्वेचा लेटलतीफ प्रवास असो, वा साहित्ययात्रींची प्रवासात झालेली दैना. राज्यातून दोन विशेष रेल्वेगाड्यांनी साहित्यप्रेमी रसिकांना घुमान येथे नेण्यात आले होते. नाशिकहून विशेष रेल्वेगाडी वेळेवर निघाली असली, तरी मुंबईहून निघणारी विशेष रेल्वे सुमारे पाच तास उशिरा निघाली. त्यामुळे पुण्यात ताटकळत बसलेल्या साहित्यप्रेमी रसिकांचे हाल झाले. दोन्ही रेल्वेगाड्या विशेष असल्याने त्या इतर नियमित रेल्वगाड्यांना जागा करून देत आपला प्रवास करत होत्या. आड जंगलात थांबून मागून येणाऱ्या तीन-तीन रेल्वगाड्यांना वाट देत होत्या. त्यामुळे साहजिकच घुमानला पोहचायला उशीर लागला.

नाशिकची पहिली रेल्वेगाडी पहाटे तीनला उडमुडतांडा येथे पोहचली. पंजाब सरकारकडून स्वागतासाठी असलेली मंडळी सांयकाळी पाच वाजल्यापासून त्या छोट्याशा स्टेशनवर रेंगाळत होती. मात्र रेल्वेगाडी


ईमेल : kalimazim2@gmail.com

पोहचली तेव्हा फक्त चहा देणारी आणि घुमानपर्यंत घेऊन जाणारी ड्रायव्हर मंडळी हजर होती. पोलिसातील उच्च अधिकारी येईस्तोवर साहित्ययात्री बसमधे बसून डुलक्या घेत होती. अशात स्वयंसेवक म्हणून आलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विकास मालवडेला पोटात त्रास होत असल्याने शासकीय रुग्णालयात रवाना करण्यात आले. सुमारे दोन तासानंतर बसेस घुमानकडे निघाल्या; तर मुंबईहून निघालेली विशेष रेल्वे अजून पानिपतमध्येच रेंगाळली होती. त्यामुळे पहिल्या दिवसाचे कार्यक्रम चार तास पुढे ढकलावे लागले.

पंजाब सरकारने साहित्य संमेलनाचा कार्यक्रम शासकीय घोषित केल्याने तीर्थाटनाला आलेल्या वारकऱ्यांचे पंजाब सरकारच्या खजिन्यातून चांगलेच झाले. आगामी काळात परिसरात निवडणुका आहेत. त्यामुळे पंजाबच्या शिंपी, अर्थात शिबा समाजाला खुश करून अकालींसोबत आणण्यासाठी नामदेव पॉलिटिक्स बादलने खेळल्याचे म्हंटले जात आहे. साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम थाटामाटात पार पडला. पण प्राध्यापकीय शैलीत मांडलेल्या अध्यक्षीय भाषणाने नामदेवप्रेमी पुरते कंटाळले होते. अर्थातच मोरे साहित्यिक नसून अभ्यासक आहेत. त्यामुळे साहित्य संमेलनाचे परंपरागत अध्यक्षीय भाषण खुमासदार असते, हे मोरेंना सरांना अपवाद ठरले. अध्यक्षपदाच्या शर्यतीत असलेले साहित्यिक आणि त्यांची समर्थक भावंडे मोरेविरोधक असल्याने आलीच नाहीत. सदानंद मोरे तर साहित्यिक नाही, मात्र संत साहित्याचे अभ्यासक म्हणून त्यांना मानणारा मोठा वर्ग वारकरी आहे. त्यामुळे संमेलनात वारकरी असणार हे ग्राह्यच होते. विठ्ठल..! विठ्ठल..! ऐकण्याची सवय असलेल्या वारकरी मंडळीला अर्किमिडीज, नेमाडे, कोल्हटकर कळावेच, अशी अपेक्षा रास्त नाही.

दोन माजी अध्यक्षांशिवाय कोणतेच साहित्यिक संमेलनात नव्हते. खाजगीतून आलेले दोन-तीनशे साहित्य शौकीन आणि रसिक उदघाटन समारंभ आटोपताच उत्तर भारताच्या पर्यटनाला गेले. साहित्यिक नसलेले बहुदा हे पहिलेच संमेलन असावे. या प्रकाराची चांगलीच री माध्यमाने ओढली होती. तरीही आयोजक आणि साहित्य महामंडळाने आपल्या जवळच्या चिरपरिचित, पुणे-मुंबईच्या (?) वक्त्यांना आमंत्रणे दिली होती. परंतु ऐनवेळी अनेकांनी आमंत्रणे स्विकारून संमेलनाला न येणे पसंत केले. अशा परिचित निवडीबद्दल अनेकांनी नाराजीचा सूर काढला असला, तरी महामंडळाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे पसंत केले. असे असले, तरी पंजाबच्या विविध शहरातून अनेक दर्शक (!) मंडळी संमेलनाला आली असल्याने पन्नास हजार बैठक व्यवस्था असलेल्या सभामंडपात मराठीभाषकांना बसायला जागा नव्हती. त्यामुळे नटून-थटून साहित्ययात्री स्वरूपात आलेली वारकरी मंडळी सभामंडपाच्या बाहेर थांबली होती. मराठी साहित्य संमेलनाच्या मराठी भाषणाला कंटाळल्याने पंजाबीभाषक अस्वस्थ दिसत होते. उदघाटन सत्र सुरू होताच काही वेळाने पगडीवाल्यामधे चलबिचल सुरू झाली. संमेलनाचा थाटमाट बघून आलेली शीख मंडळी फसवणुकीचा बळी ठरल्याचे भाव चेहऱ्यावर आणत होती.

दुसऱ्या दिवशी सत्र तासाभराने उशिरा सुरू केले, तरी सभामंडपात साहित्यरसिकांची तुरळक गर्दी होती. दोन सत्रं झाली, तरी सभामंडप ओस पडले होते. पहिल्या दिवशी नटलेली मंडळी मात्र दुसऱ्या दिवशी परिसंवादाला कल्टी मारून पॅकेज वसूल करण्यासाठी अमृतसर वारीला निसटली होती. केवळ तीन हजारात संमेलन यात्रा घडवून आणणाऱ्या निमंत्रकांचे प्रतिनिधी शनिवारी पहाटेपासून तपियाना आणि चिमा परिसरात घाई करत होते. सकाळी अकरापर्यंत पंजाब सरकारने बियास आणि उड मुड स्टेशनवरून घुमानला जाण्यासाठी लावलेल्या बसेस घेऊन साहित्ययात्री तीर्थाटनसाठी अमृतसरला पसार झाली होती. आमंत्रित वक्ते रिकाम्या खुर्च्यांना परिसंवाद ऐकवीत होते. महाराष्ट्रातून दोन रेल्वेतून साहित्यप्रेमीवजा नामदेवभक्तांना आकर्षक पॅकेज वाटून निमंत्रकांनी रेल्वे भरण्याचे टार्गेट पूर्ण केले होते. हे सबंध रेल्वे प्रवासात कीर्तन करून साहित्यिक चर्चा आणि कवीकट्ट्याला अडसर ठरले होते. नाशिक येथून निघालेल्या सुमारे अशा सुमारे हजारएक यात्रेकरूंना साहित्ययात्रीचं गोंडस नाव देण्यात आलं होतं. शिवाय या पॅकेजमधे नवीन कपडे, घुमानचे नामदेवदर्शन, अटारीसीमा, जालियनवाला आणि अमृतसरचे सुवर्ण मंदिर असं एकत्रित पर्यटन टूर होतं. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक नामदेवाच्या वारीला निघाले होते. असे अनेक ज्येष्ठ नागरिक सभामंडपात ठेच लागून पडल्याची दृश्ये सर्वांनी पाहिली.

नामदेवप्रेमीचे तीर्थाटन आयोजकांच्या लक्षात येताच त्यांनी पुन्हा पंजाब सरकारकडे दर्शक पुरवण्याची

विनवणी केली. पंजाब सरकारने तात्काळ साप्ताहिक सुट्टी असतानाही कर्मचाऱ्यांना कुटुंबासह संमेलन सक्तीचे केले. भाषा कळत नसल्यामुळे निघून गेलेला वर्ग बळजबरीने पुन्हा सभामंडपात येऊन बसला. भाषिक अपमान सहन करत पगडीधारी खुर्च्यांना चिटकून होते; तर काही पगडीधारी तुरळक असलेल्या प्रकाशकांची पुस्तके चाळत होते. परिसंवादात विषयांसंदर्भात सांगोपांग चर्चा न झाल्याने मराठी साहित्यप्रेमी रसिक सभागृहाबाहेर उपस्थित वक्त्यांचे दुखडे गात फिरत होता.

तिसऱ्या दिवशी परतीच्या प्रवासासाठी अमृतसर मुक्कामी असलेले नामदेवप्रेमी सभामंडपात हजेरी लावत होते. सभामंडपात रविवार असल्याने पगडीधारी मोठ्या संख्येने होते. सरकारने सक्ती केल्याने पंजाबी बांधव आपल्या कुटुंबासह हजर होते. साहित्यिकांशिवाय सुरू झालेलं हे संमेलन समारोपापर्यंत आले होते. समारोपाला व्हीव्हीआयपी मंडळी येणार असल्याने घुमान परिसराला छावणीचे स्वरूप आले होते. एव्हाना अमृतसरहून साहित्ययात्री मंडळी बऱ्यापैकी सभामंडपात हजर झाली होती.

मुख्यमंत्री फडणवीस येणार असल्याने मराठी आणि पंजाबी बहुसंख्येने उपस्थित होते. केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू , महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे, सुखबीर बादल, सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील, अरुणाचल प्रदेशचे माजी राज्यपाल जे.जे सिंग, गुरुदासपूरचे जिल्हाधिकारी अभिनम त्रेखा, जिल्ह्याचे एसपी इंदरसिंग इत्यादी मंडळी समारोपाला उपस्थित होती. यावेळी अनेक घोषणा झाल्या. ज्यात चाळीस हजार लोकवस्ती असलेल्या घुमान परिसराचा विकास करण्यासाठी डेव्हलपमेंट बोर्ड स्थापन करण्यात आले. राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा बहाल करण्यात आला. गुरू नानक विद्यापीठात नामदेव अध्यासन केंद्र स्थापन करण्यात आला. घुमान ते चंदीगढ रस्ता चार पदरी करण्यासाठी सुमारे १८०० कोटीचा निधी देण्यात आला. आनंदपूर ते नांदेड महामार्गाला मंजुरी देण्यात आली. घुमान येथे दहा एकर जागेवर १२ कोटी खर्चून बाबा नामदेव आर्टस आणि सायन्स कॉलेजचे भूमिपूजन करण्यात आले. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात गुरू नानक अध्यासनाची उभारणी करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. मात्र साहित्य परिषदेने मांडलेल्या घुमान ते पंढरपूर रेल्वेमार्गावर सुरेश प्रभू काहीच बोलले नाहीत.

घोषणांमुळे घुमानवासी संमेलन भरवल्याचे सार्थक झाल्याच्या आनंदात होते. साहित्य संमेलनाने मराठी साहित्यात काही विशेष घडले नसले, तरी किमान घुमान परिसराचा विकास तर साधला यातच साहित्यप्रेमींना आनंद होता. मात्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा विकास अमृतसरच्या गुरू नानक हॉस्पिटलमधे पडून होता. सुमारे तीन दिवस उलटले तरी त्याची कसलीच दखल आयोजकाच्या वतीने घेण्यात आली नव्हती. शनिवारी त्याचे अॅपेंडिस्कचे ऑपरेशन झाले. परंतु आयोजकाकडून त्याला बघायला कोणीच गेले नाही. त्याचे सहकारी मित्र त्यास एकटाच सोडून महाराष्ट्रात परतले आहेत. पंजाबी आणि मराठी मनाची सरहद तोडण्यात आयोजक यशस्वी ठरले असले, तरी मराठी साहित्यास ठोस असे काही न दिल्याने साहित्यरसिकांची मात्र घोर निराशा झाली.

प्रकाशकांनी बहिष्कार टाकून महाराष्ट्राबाहेरील अमराठी बांधवांना मराठी प्रकाशन व्यवहाराची ओळख करून देण्याची ही नामी संधी गमावली. तसेच हिंदी साहित्यग्रंथ आणून बऱ्यापैकी विक्री व्यवहार करता आला असता. याचा विचार कधीही आम्हाला आला नाही असे अक्षर मानव आणि शब्द प्रकाशनने कबूल केले. मराठीपणा तसा वादाचाच विषय राहिला आहे. मराठी माणूस असो, नाटके किंवा चित्रपट नेहमी वादाच्या केंद्रस्थानी असतात. विशेषत: मराठी भाषा हा राज्य आणि परराज्यात कायम वादाचा विषय राहिला आहे. मराठी भाषा आणि साहित्याचे भवितव्य आणि तिच्या अस्तित्वाविषयी अधूनमधून काळजीयुक्त चर्चा होते. मराठी अस्मिता आणि आणि मराठी भाषा या कायम धोक्यात येणाऱ्या गोष्टी आहे, असे भासवले जाते. त्यासाठी भरीव निधी मिळवून परिसंवादाचे आयोजन करण्यात येते. त्यात ठराविक वक्ते आणि आयोजक यांच्यात पुणे-मुंबई पुरतीच मांडवली होते. पण साहित्यव्यवहाराचे काय? असा प्रश्न शेवटी उरतोच. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातून काही साध्य होईल का? का असाच कोट्यवधी रुपयांचा साहित्यव्यवसाय होत राहणार.

●